महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
महाराष्ट्र शासनाची संस्था
Maharashtra Energy Development Agency (MEDA)
A Government of Maharashtra Institute
सत्यमेव जयते
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
MEDA महाऊर्जा

पीजीएन-१/२०२०-२१/धोरण २०२०/११०अ/४८ दि. २१ एप्रिल, २०२३

## " आदेश"

विषय: प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजनेंतर्गत घटक 'अ' व घटक 'क' अंतर्गत आस्थापित होणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या नोंदणीकरीता प्रकल्प नोंदणी शुल्क आकारणेबाबत.

संदर्भ: १. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. २२/०७/२०१९ रोजीचे मार्गदर्शक सूचना
२. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० शासन निर्णय क्र.अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दि. ३१/१२/२०२०
३. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत कार्यपध्दती शासन निर्णय क्र.अपाऊ-२०२०/ प्र.क्र.१३७(अ)/ऊर्जा-७, दि. ११/०५/२०२२
४. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१९/ प्र.क्र.२६८/ ऊर्जा-७, दि. १२/५/२१
५. महाऊर्जा कार्यालयाचे आदेश क्र.पीजीएन-१/धोरण-२०२०/परिपत्रक/२०२२-२३/१९१७, दि. २५/०५/२०२२.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि. २२/०७/२०१९ रोजीचे मार्गदर्शक सूचना अन्वये देशात प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजना जाहीर केली आहे.

राज्य शासनाने वरील संदर्भीय क्र.४ चे शासन निर्णयान्वये राज्यातील कृषी पंप वीज जोडण्याचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याचे अभियान जाहीर केलेले आहे. या अभियांनांतर्गत घटक 'अ' व घटक 'क' अंतर्गत आस्थापित होणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पाची महाऊर्जाकडे ऑनलाईन पोर्टलव्दारे नोंदणी करणे बंधनकारक आहे.

राज्याचे नवीन व नवीकरणीय (अपारंपरिक) ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीच्या प्रकल्पांसाठी पारेषण संलग्न / पारेषण विरहीत एकत्रित अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण- २०२० शासन निर्णय क्र. अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७/ दि. ३१.१२.२०२० अन्वये जाहीर करण्यात आले आहे. सदरच्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरणांतर्गत पोरषण संलग्न व पोरषण विरहित अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प आस्थापित /कार्यान्वित करण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय क्र. अपाऊ-२०२०/ प्र.क्र.१३७(अ)/ऊर्जा- ७ दि. ११/०५/२०२२ अन्वये निश्चित करण्यात आली आहे.

या कार्यपध्दतीअंतर्गत आस्थापित करावयाच्या पारेषण संलग्न अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांबाबत पारेषण जोडणी ते सदर प्रकल्प कार्यान्वित होई पर्यंतची सर्व प्रक्रिया महाऊर्जाव्दारे विकसित केलेल्या ऑनलाईन पोर्टलव्दारे राबविण्यात येणार आहे.

दि. ३१/१२/२०२० च्या धोरणांतर्गत सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची तदर्थ नोंदणी करण्यासाठी महाऊर्जाच्या वेब पोर्टलचा वापर करण्यात येईल. याबाबत महाऊर्जाकडून विहित शुल्क आकारण्यात येईल असे नमूद आहे. यास अनुसरुन प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजनेअंतर्गत कुसुम घटक 'अ' व 'क' अंतर्गत आस्थापित होणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी करण्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यात येत आहे.

**शुल्काचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील | शुल्क (रु.) |
|---|---|---|
| १ | विकासक / प्रकल्पधारक नोदणी | ५०००/- + १८% जीएसटी |
| २. | अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची वेब पोर्टलवर प्राथमिक नोंदणी | ५०००/- प्रति प्रकल्प + १८% जीएसटी |
| ३. | प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) अंतर्गत घटक ‘अ’ व ‘क’ करीता प्रकल्प नोंदणी शुल्क | ५०,०००/- प्रति मे.वॅ. + १८% जीएसटी |

उपरोक्त नमूद शुल्कामध्ये वेळोवेळी होणारे बदल लागू राहतील.

तरी वरील बाबींच्या अनुषंगाने शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने करणेत यावा.

(रविंद्र जगताप, भा.प्र.से.)
महासंचालक, महाऊर्जा
२१/४/२३

प्रत -

१. खाजगी सचिव
मा. मंत्री महोदय (ऊर्जा) न.व.न.ऊ मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

२. मा. प्रधान सचिव (ऊर्जा)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

३. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई

४. सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प विकासक / प्रकल्प धारक

५. सर्व विभाग प्रमुख, महाऊर्जा मुख्यालय, पुणे.

६. उपसंचालक (लेखा), महाऊर्जा, पुणे.